**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र
'A' Re-accrediated by NAAC (2014)With CGPA-3.16
PHONE: EPABX – 0091-0231-2609000 CoE Office: 0231-2609067
B.A. Exam. Section: 0231-2609116 FAX: 0091-0231-2690655
Website: www.unishivaji.ac.in E-mail: coe@unishivaj.ac.in

---

संदर्भ क्र: शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/२२५५ दिनांक :- ११/०७/२०१६

**अति महत्वाचे**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
(अभियांत्रिकी व औषधनिर्माणाशास्त्र, शिक्षणशास्त्र महाविद्यालये वगळून)

विषय :- ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१६ पासून प्रथम वर्ष प्रवेश व परीक्षा अर्ज व इतर परीक्षा अर्ज युनिशिवाजीच्या संगणक प्रणाली मध्ये ऑनलाईन भरणेसंबंधीच्या प्रशिक्षण कार्यशाळेस उपस्थित राहणेबाबत.

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया नोंदणी अर्ज, पात्रता अर्ज व परीक्षा अर्ज, तसेच मार्च २०१६ मध्ये झालेल्या प्रथम वर्षाच्या निकालानंतर सत्र ३ चा परीक्षा अर्ज, सत्र १ ते ६ रिपीटरचे सर्व परीक्षा अर्ज व सत्र ५ च्या फ्रेश विद्यार्थ्यांचा परीक्षा अर्ज Unishivaji या पोर्टल वरील Online.shivajiuniversity.in या संगणक प्रणालीमधून भरावयाचे आहेत.

उपरोक्त प्रवेश व परीक्षा अर्ज संगणक प्रणालीमध्ये योग्य प्रकारे एंट्री करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हानिहाय खालीलप्रमाणे कार्यशाळा आयोजित केलेली आहे. सदर माहिती देण्यासाठी श्री पळसे जी.आर, डॉ. मिलिंद जोशी, श्री उदय करवडे, श्री. विकास मोहिते, श्री. अमोल आडगुळे उपस्थित राहणार आहेत .तरी सदर कार्यशाळेसाठी आपल्या महाविद्यालयातील परीक्षेचे कामकाज पहाणारे व परीक्षा अर्ज भरणारे अशा दोन कर्मचा-यांना उपस्थित राहण्याबाबत सूचना दयाव्यात. कार्यशाळेस उपस्थित कर्मचा-यांना चहा व बिस्कीट देण्यात येतील.

| जिल्हा | कार्यशाळेचे ठिकाण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| सातारा जिल्हा | छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | १४ जुलै, २०१६ | दुपारी १२.०० ते ०३.०० |
| कोल्हापूर जिल्हा | श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर | १५ जुलै, २०१६ | सकाळी १०.०० ते ०१.०० |
| सांगली जिल्हा | श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली | १५ जुलै, २०१६ | दुपारी ०३.०० ते ०५.०० |

कार्यशाळेसाठी उपस्थित राहण्यासाठी संबंधितांचा फक्त प्रवास खर्च महाविद्यालयास उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या परीक्षा केंद्रासाठी ॲडव्हान्स रक्कम A.3.P27 Expenditure on Exam at centres यातून विद्यापीठ नियमानुसार संबंधीत महाविद्यालयातून आदा करण्यात यावा. स्वत:चे वाहन वापरताना किंवा दुचाकी वाहन वापरणा-यांसाठी विद्यापीठ नियमानुसार देयक आदा करण्याबाबतची काटेकोर दक्षता घ्यावी.

उपरोक्त कार्यशाळा मर्यादीत वेळेची असल्यामुळे वेळेत उपस्थित राहून माहिती समजावून घ्यावी जेणेकरुन कार्यशाळेचा समारोप वेळेत करता येईल.

कळावे,

आपला विश्वासू,
**सही/-**
(महेश काकडे)
परीक्षा नियंत्रक

प्रत : सर्व परीक्षा विभाग प्रमुख यांना माहितीसाठी